# बालकराम

दि. २२ जानेवारी २०२४. न विसरता येणारा असा हा दिवस आम्हा भारतीयांच्या आयुष्यातील एक सुवर्ण असा दिन. इतक्या वर्षांची रामाला बघण्याची उत्सुकता लागलेली. ज्याचे गुणगान करतांना तन, मन थकतच नाही. अशा आपल्या रामरायांचे अन् त्यातही बालकरामाचे प्रथम दर्शन घेतांना अश्रूंचा बांध नकळत फुटला. वाटलं सगळी सृष्टी आनंदाच्या, परम् आनंदाच्या लहरीवरी न्हाऊन निघाली आहे.

प्रथम तुज पाहता रामा
नीर गाली ओघळती ।
सार्थक झाले आज जन्माचे
रामराया अवतरले अवनीवरती ।।

काय वर्णु तव गुण । एकटक बघतच रहाव वाटत तुझ्या वदनाकडे. स्मितहास्य बघता तुझे हरपले देहभान. बालसुलभ स्मितहास्यात सर्व जनाला सामावून घेण्याची जी शक्ति आहे. जे आश्वस्थ असं हास्य आहे. वाटलं की कल्पवृक्षाच्या छत्रछायेखाली, माऊलीच्या कृपाप्रसादात आपण सगळे खूप खूप निर्धास्त झालेलो आहोत.

क्षणार्धात सगळंच विसरलो अन् किती निरखू, किती न्याहळू असं झालं. तनाच्या प्रत्येक रोमारोमात, मनाच्या प्रत्येक कप्प्यात तुझे रुप किती साठवू असं झालेलं. बाल-लोचनासमोर रामरायाचे प्रत्येक रुप दिसू लागले. बाल-लीलेतील राम, युवक राम, आज्ञाधारक राम, संयमी राम, बंधुभाव जपणारा राम, एकवचनी राम, भावविभोर होणारा राम, मैत्रीभाव जपणारा राम. किती रुपे असावी अवतारी मानवामध्ये.

प्रभू श्रीराम भारतभूमीवर जन्माला येणं म्हणजे आपलं केवढं महत्‌भाग्य. अशा या बालकरामाची प्राणप्रतिष्ठा 'याचि देहि याचि डोळा' अनुभवणं किती सुंदर स्वप्न आणि भाग्य.

मागणे रामा तुजपाशी
एकरूप होऊ दे तव चरणांशी ।
हा देह हो तुझ्या हृदयाशी
भाव जडेल मग तुझ्या मनाशी ॥

त्रिवार जयजयकार रामा, त्रिवार जयजयकार ॥
जय श्रीराम !



सौ. अस्मिता बालेकर
वंदेमातरम्, नवाथे नगर,
अमरावती.

